# सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी

यांचे कार्यालय,२ रा मजला,रेव्हियुन्यु डिपा.सो.इमारत,कलेक्टर ऑफीस आवार,रत्नागिरी,

जा.क्र रानिर/७१/श्रीसाईबाबाग्रामीणबिगरशेतीपत/काक७७(अ)/२०१७
दिनांक - ०७.१२.२०१७

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये प्राधिकृत अधिकारी मंडळाच्या नियुक्तीचा आदेश

वाचा - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)

वाचले – व्यवस्थापक,श्री साईबाबा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.मिरजोळे,ता.जि.रत्नागिरी यांचेकडील दि.०४.१२.२०१७ रोजीच्या पत्रासोबतचे संचालक मंडळ सदस्य यांचे राजीनामा पत्र.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील तरतुदीनुसार ,श्री साईबाबा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.मिरजोळे,ता.जि.रत्नागिरी या संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे तरतुदीनुसार झाली असून तीचा नोंदणी क्रमांक आरटीजी/(आरटीजी)/ आरएसआर/(सीआर)/७३८/सन१९९९ दिनांक ३०.०६.१९९९ आहे. यापुढे सदर संस्थेचा उल्लेख उक्त संस्था असा करण्यात आला आहे. आणि,

ज्याअर्थी संस्थेच्या एकुण संचालक मंडळांची संख्या १३ असून त्यापैकी ११ सदस्य सध्या संचालक मंडळ सदस्य म्हणून कार्यरत आहेत .त्यापैकी १० सदस्यांनी संस्थेचे कामकाज करण्यास इच्छुक नसल्याने त्यांनी संचालक पदाचा राजीनामा संस्था अध्यक्ष यांचेकडे दिला आहे.समितीने आपले कामकाज करणे थांबविले आहे. त्यामुळे व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झाली आहे. आणि त्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज सुरळितरित्या चालू राहणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये संस्थेवर प्राधिकृत अधिकारी नेमणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी,मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ) अन्वये, मला प्राप्त अधिकारानुसार मी एस.डी.तोडणकर,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,रत्नागिरी. आदेश देतो की, श्री साईबाबा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.मिरजोळे,ता.जि.रत्नागिरी या संस्थेच्या समितीने आपले पदाचे राजीनामे दिले असून कामकाज करणे थांबविले आहे. त्यामुळे व्यवस्थापकीय पोकळी निर्माण झाली आहे, या कारणास्तव संस्थेवर ६ महिने मुदतीकरता श्री.संतोषकुमार शिवाजी पाटील,मुख्यलिपीक,अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

वरील प्राधिकृत अधिकारी यांनी नवीन समितीच्या निवडणूकीची व्यवस्था करून संस्थेचा ताबा नवीन समितीकडे सोपविण्याची कार्यवाही करावी अथवा संस्थेच्या हिताचे दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी.सदरचा आदेश माझे सही शिक्क्यानिशी आज दिनांक ०७.१२.२०१७ रोजी दिला आहे.

ठिकाण - रत्नागिरी

दिनांक - ०७/१२/२०१७

(एस.डी.तोडणकर)
सहाय्यक निबंधक,
o/c सहकारी संस्था,रत्नागिरी.

प्रत -

श्री.संतोषकुमार शिवाजी पाटील,मुख्यलिपीक,अधिन सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रत्नागिरी तथा प्राधिकृत अधिकारी श्री साईबाबा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.मिरजोळे,ता.जि.रत्नागिरी

त्यांनी उक्त संस्थेच्या दप्तराचा व जायदादीचा रितसर ताबा घेउन दैनंदिन कामकाज सांभाळावे व ताबा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.तसेच प्राधिकृत अधिकारी कालावधीत संस्थेची निवडणूक घेवून नवनिर्वाचित समितीकडे संस्थेचे कामकाज सुपूर्त करावायाचे आहे.

प्रत माहितीसाठी

१.माजी चेअरमन/व्यवस्थापक ,श्री साईबाबा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.मिरजोळे,ता.जि.रत्नागिरी.

२/- यांनी संस्थेच्या दप्तराचा व जायदादीचा ताबा प्राधिकृत अधिकारी मंडळाकडे त्वरीत सुपूर्त करावा.

२.मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,रत्नागिरी

३.मा.जिल्हा विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था रत्नागिरी यांना सविनय सादर

मा.शाखाधिकारी रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., रत्नागिरी शाखा कुवारबाव.रत्नागिरी.

(एस.डी.तोडणकर)
सहाय्यक निबंधक,
o/c सहकारी संस्था,रत्नागिरी.